**<u>नियमित दिवाणी पुनर्वाद क्र. १५६/२०१६ (सुधाकर गणपत राऊत वगैरे –पुनर्वादी वि. सूर्यकांत गणपत राऊत वगैरे– उत्तरवादी) मधील नि. ४७ वरील आदेश</u>**

प्रस्तुत प्रकरणी उत्तरवादी क्र. ४ ते ८,११ व १२ यांनी त्यांचेविरुध्द झालेला एकतर्फी सुनावणी आदेश रद्द करणेकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे . प्रस्तुतचे उत्तरवादी क्र . ४ ते ६ यांचेविरुध्द दि. २०/०२/२०१९ रोजी तर उत्तरवादी क्र. ७, ८, ११ आणि १२ यांचेविरुध्द दि. १६/१०/२०१९ रोजी एकतर्फी सुनावणीचे आदेश झालेले आहेत . सदरहू अर्जास पुनर्वादी यांनी त्यांचे वकीलांमार्फत नाहरकत दिलेली आहे. न्यायाचे दृष्टीने सदरहू उत्तरवादींविरुध्द झालेला एकतर्फी आदेश रद्द होणे आवश्यक आहे. सबब आदेश.

**<u>आदेश</u>**

१. उत्तरवादी क्र. ४ ते ८,११ व १२ यांचेविरुध्द झालेला एकतर्फी सुनावणीचा आदेश रद्द करणेत येत आहे.

२. येणेप्रमाणे सदर अर्ज निकाली करणेत येत आहे.

(शि. व. हांडे)
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
सिंधुदुर्ग–ओरोस.

दिनांकः– २५/०३/२०२२